# भाग ३ - वेतन/भत्ते / रोखिकरण

क्रमांक:पोअय/सआली-४/मयत पोहवा-१६२२/२०२० ४५९९
कार्यालय पोलीस अधिक्षक, यवतमाळ
एल. आय. सी. चौक, ता. व जि. यवतमाळ
पिन कोड: ४४५ ००१.
Email- sp.yavatmal@mahapolice.gov.in
दिनांक 16 OCT 2020

कार्यालयीन आदेश :-

पोहवा/1622 शैलेश पुंडलीक शिंदे, यांचे दिनांक 18.06.2017 रोजी निधन झाल्याने, त्यांचे 07 व्या वेतन आयो वेतननिश्चीती करणे बाबत सेवापुस्तक प्राप्त झालेले आहे. करीता त्यांची सातव्या वेतन आयोगाप्रमाणे सुधारीत वेतन मे वेतननिश्चीती करण्यात येत आहे.

महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन)नियम 2019 वित्त विभाग अधिसुचना क्रमांक वेपुर -2019/प्र.क्र.-1/सेवा- 30.01.2019 व शासन निर्णय अधिसुचना क्रमांक वेपुर -2019/प्र.क्र.10/सुधारणा-1/सेवा-9 दिनांक 20.02.2019 व वि शासन परिपत्रक क्रमांक वेपुर-2019/प्र.क्र-8/सेवा-9 दिनांक 2019 अन्वये सुधारित वेतन निश्चीतीसाठी दिलेल्या विकल्पानु जोडपत्र-4 वचनपत्राचे अधिन राहुन खालीलप्रमाणे 07 वे वेतन आयोगानुसार दिनांक 01.01.2016 पासुन वेतन निश्चीती येत आहे.

| 06 वेतन आयोगानुसार वेतनसंरचना (5200-20200 ग्रेड पे.2500) | | | | 07 वे वेतन आयोगानुसार सुधारित वेतननिश्चीती | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | वेतन संरचना :- 26400-83600 (S-9) | | | | |
| | | | | दिनांक 01.01.2016 चे मुळ वेतन 11800+2500=14300X2.57 गुणांकाप्रमाणे येणारे वेतन :- 36751 | | | | |
| | | | | 11800 | 2500 | 14300 | 36751 | S-9 LEVEL 13 नुसार वेतन 376 |
| वेतनवाढीचा दिनांक | वेतन | ग्रेड वेतन | वे.वा.दिनांक | वेतन | वेतनवाढ | | | एकुण वेतन |
| 01.01.2016 | 11800/- | 2500/- | 01.01.2016 | वेतन मॅट्रीक्स (S-9 LEVEL 13 नुसार दिनांक 01.01.2016 चे वेतन ) | | | | 37600 |
| 01.07.2016 | 12230/- | 2500/- | 01.07.2016 | 37600 | 1100 | | | 38700 |

सदरचे वेतननिश्चीतीचे आदेश हे वेतनपडताळणी पथकाच्या तपासनीचे अधिन राहुन निर्गमीत करण्यात येत आ

१५/१०/२०

(डॉ.दिलीप पाटील - भुजबळ)
पोलीस अधीक्षक, यवतमाळ

प्रति
वेतन लिपीक क्र.1 कक्ष-18 यांना व्दिप्रतीत योग्य कार्यवाहीस्तव
प्रत : पेन्शन लिपीक/डिपीजी लिपीक

क्रमांक :पोअय/कक्ष - ९/आंजिब/हजर/ 8461 /२०२०
कार्यालय पोलीस अधीक्षक, यवतमाळ.
एल. आय. सी. चौक, ता. व जि. यवतमाळ.
पिन कोड: ४४५ ००१.
Email- sp.yavatmal@mahapolice.gov.in
दिनांक : 15 OCT 2020

संदर्भ - पोलीस अधीक्षक नांदेड यांचे पत्र क्र. जा.क्र.आस्था-7/आंजिब/पो.कर्म./ कार्यमुक्त /2020/2187 दि. 18/09/2020

विषय - आस्थापनेवर हजर करुन घेणेबाबत.

-----00-----

## आदेश

पोलीस अधीक्षक नांदेड यांचे पत्र क्र. जा.क्र.आस्था-7/आंजिब/पो.कर्म./ कार्यमुक्त/2020/2187 दि. 18/09/2020 अन्वये पोलीस अधीक्षक नांदेड यांचे आस्थापनेवरील खालील नमुद पोलीस कर्मचारी हे या आस्थापनेवर दि. 10/10/2020 रोजी हजर झाले आहेत.

नमुद पोलीस कर्मचारी यांना या घटकात हजर करुन घेण्यात आले असुन त्यांना जिल्हयाचा रिक्त बक्कल नंबर खालीलप्रमाणे देण्यात येऊन त्यांची नेमणूक दर्शविलेल्या ठिकाणी करण्यात येत आहे.

| अ.क्र. | पोलीस कर्मचारी यांचे नाव, पदनाम व बक्कल नंबर | देण्यात आलेला बक्कल नंबर | नेमणुकीचे ठिकाण |
|---|---|---|---|
| 01 | मपोशि/२०४४, मंजुषा अशोकराव बरडे | 2194 | पोलीस मुख्यालय, यवतमाळ |

13/10/2020

( डॉ. दिलीप पाटील - भुजबळ )
पोलीस अधीक्षक, यवतमाळ

प्रति,

वर नमुद संबंधीत पोलीस कर्मचारी

मार्फत - राखीव पोलीस निरीक्षक, पो. मुख्या. यवतमाळ/पो. नियंत्रण कक्ष यवतमाळ

प्रत - वेतन लिपीक - 1/आस्थापना कक्ष 9 (5)/राजपत्र लिपीक/भ.नि.नि. लिपीक/वस्त्र भांडारपाल यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीस.

प्रत माहितीस - पोलीस उप अधीक्षक, (मुख्या.) यवतमाळ

प्रत अग्रेषित - पोलीस अधीक्षक नांदेड

2/- वरील नमुद पोलीस कर्मचारी यांचे सेवापट परिपुर्ण नोंदीसह या कार्यालयास पाठविण्यात यावे.

8484

क्र:पोअय/कक्ष-१०/उविपोअ-पुसद-उमरखेड/अति.कार्यभार/ /२०२०
कार्यालय पोलीस अधीक्षक, यवतमाळ.
एल. आय. सी. चौक, ता. व जि. यवतमाळ.
पिन कोड: ४४५ ००१.
Email- sp.yavatmal@mahapolice.gov.in
दिनांक : 15 OCT 2020

## आदेश

संदर्भ :-१.पोलीस स्टेशन, पुसद शहर, ठाणे दैनंदिनी क्र.३५/२०२०, दि.१४/१०/२०२०
२.पोलीस नियंत्रण कक्ष, यवतमाळ दैनंदिनी क्र.३८, दि.१४/१०/२०२०

विषय :-श्री.अनुराग जैन (भा.पो.से.),सहायक पोलीस अधीक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, पुसद उपविभाग तथा अतिरिक्त कार्यभार उमरखेड यांनी रुग्णनिवेदन केल्याने उपविभागीय पोलीस अधिकारी, पुसद उपविभाग तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी, उमरखेड उपविभाग या पदाचे अतिरिक्त कार्यभाराबाबत.

****

उपरोक्त विषय व संदर्भान्वये श्री.अनुराग जैन (भा.पो.से.),सहायक पोलीस अधीक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, पुसद उपविभाग तथा अतिरिक्त कार्यभार उपविपोअ/उमरखेड यांनी कळविले आहे की, दिनांक १४/१०/२०२० रोजी दुपारचे वेळी अचानक पाठीत दूखत असल्याने उपचाराकामी उपजिल्हा रुग्णालय, पुसद येथे उपचार केला, तथापी जास्त त्रास होत असल्याने पुढील उपचाराकामी जिल्हा रुग्णालय, यवतमाळ येथे रवाना झाले. वैदयकीय अधिकारी, जिल्हा रुग्णालय, यवतमाळ यांनी त्यांना पुढील उपचाराकामी नागपूर येथे जाण्याचा सल्ला दिल्याने ते रुग्ण निवेदन करुन उपचाराकामी नागपूर येथे रवाना झाले आहेत.

नजीकच्या काळात दुर्गा उत्सव/शारदोत्सव/धम्मचक्र परिवर्तन दिन व ई-ए-मिलाद या सारखे कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीकोनातून महत्वाचे सण व उत्सव आहेत. त्यामुळे श्री.अनुराग जैन (भा.पो.से.),सहायक पोलीस अधीक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, पुसद उपविभाग हे वैद्यकीय रजेवरुन परत कर्तव्यावर हजर होईपर्यंत उपविभागीय पोलीस अधिकारी, पुसद उपविभाग तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी, उमरखेड उपविभाग यवतमाळ या पदांचा अतिरिक्त कार्यभार डॉ.श्री.के.ए.धरणे, अपर पोलीस अधीक्षक, यवतमाळ यांचेकडे सोपविण्यात येत आहे. सदर कालावधीत त्यांचे कॅम्प ऑफिस/मुख्यालय पुसद राहील.

सर्व संबंधितांनी याची नोंद घेऊन उचित कार्यवाही करावी.

१५/१०/२०२०

( डॉ.दिलीप पाटील-भुजबळ)
पोलीस अधीक्षक, यवतमाळ.

प्रति,

डॉ.श्री.के.ए.धरणे, अपर पोलीस अधीक्षक, यवतमाळ

प्रत माहितीस्तव सविनय सादर,

8486

क्र:पोअय/कक्ष-१०/उविपोअ-वणी/कार्यमुक्त/ /२०२०
कार्यालय पोलीस अधीक्षक, यवतमाळ.
एल. आय. सी. चौक, ता. व जि. यवतमाळ.
पिन कोड: ४४५ ००१.
Email- sp.yavatmal@mahapolice.gov.in
दिनांक : 15 OCT 2020

## आदेश

संदर्भ :- १.शासन आदेश गृह विभाग क्र.रापोसे-१७२०/प्र.क्र.९५/पोल-१ अ, दिनांक ३०/०९/२०२०
२.पोलीस महासंचालक,महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे क्र.पोमसं/२/१०(५)/स.सा.बदल्या-२०२०/४२/२०२०, दि.३०/०९/२०२०
३. शासन आदेश गृह विभाग क्र.रापोसे-१७२०/प्र.क्र.९७/पोल-१ अ, दिनांक १४/१०/२०२०
४.पोलीस महासंचालक,महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे क्र.पोमसं/२/१०(५)/स.सा.बदल्या-२०१९/८०/२०१९, दि.१४/१०/२०२०

विषय :-राज्य पोलीस सेवेतील पोलीस उप अधीक्षक/सहायक पोलीस आयुक्त (नि:शस्त्र) या संवर्गातील अधिका-यांची बदलीने पदस्थापना.

****

उपरोक्त विषयास अनुसरुन संदर्भ क्र.१ व २ अन्वये या आस्थापनेवरील श्री.सुशिलकुमार काशिबाराव नायक, उपविपोअ/वणी उपविभाग यांची वणी उपविभाग येथून अन्यत्र बदली करण्यात येऊन, उपविभागीय पोलीस अधिकारी, वणी या पदावर श्री.संजय गंगाराम पुजलवार, उपविपोअ-कामठी, जि.नागपूर यांची नेमणूक करण्यात आली आहे. सदर आदेशात श्री.नायक यांची सध्याच्या पदावरुन इतरत्र बदली करण्यात येत आहे व त्यांचे पदस्थापनेचे आदेश स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील असे नमूद करण्यात आले होते.

उपविपोअ/श्री.नायक यांचे बदलीचे शासनाचे व पोलीस महासंचालक यांचे उपरोक्त नमूद दि.३०/०९/२०२० रोजीचे आदेश पारित झाल्यानंतर श्री.नायक यांनी दि.०१/१०/२०२० रोजी रुग्ण निवेदन केल्याबाबत बिनतारी संदेशाद्वारे दि.०१/१०/२०२० रोजी या कार्यालयास कळविले. या दरम्यान उपविपोअ, वणी उपविभाग या पदावर बदली झालेले श्री.संजय पुजलवार हे दि.०४/१०/२०२० रोजी नियंत्रण कक्ष, यवतमाळ येथे हजर झाले व वणी येथे सायंकाळी ०७.०५ वाजता रवाना झाले. त्यानंतर श्री.पुजलवार यांनी उपविपोअ कार्यालय, वणी येथे हजर राहून उपविपोअ, वणी या पदाचे कामकाज पाहत असल्याचे या कार्यालयास दि.०४/१०/२०२० रोजी बिनतारी संदेशान्वये कळविले.

मुख्य सादरकर्ता अधिकारी, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई, खंडपीठ-नागपूर यांनी त्यांचे पत्र जा.क्र.१२६३/मॅट/२०२०,दि.०६/१०/२०२०, अन्वये श्री.सुशिलकुमार नायक, उपविपोअ, वणी यांनी त्यांचे दि.३०/०९/२०२० रोजीचे बदली आदेशासंदर्भात दाखल केलेल्या मूळ अर्ज क्रमांक ५८७/२० या याचिकेवर दिनांक ०५/१०/२०२० रोजी सुनावणी होऊन सदर सुनावणीचे वेळी मा.न्यायाधिकरणाने " Notice Before Admission returnable after three weeks and further directed to the Parties to maintain Status-quo as on today till further orders" असे आदेश पारित केल्याचे या कार्यालयास कळविले. त्यानंतर श्री.नायक यांनी रुग्णनिवेदनातून दि.०७/१०/२०२० रोजी म.पूर्व हजर होत असल्याचे या कार्यालयास कळविले असून ते सध्या वणी येथे उपस्थित आहेत.

उपरोक्त नमूद संदर्भ क्र.३ व ४ अन्वये, नेमणूकीचे प्रतिक्षाधिन असलेले श्री.सुशिलकुमार काशिबाराव नायक, उपविभागीय पोलीस अधिकारी, वणी, यांची <u>**उपविभागीय पोलीस अधिकारी, गडचांदूर उपविभाग, जि.चंद्रपूर**</u> येथे नेमणूक करण्यात आलेली आहे. त्यामुळे त्यांना नवीन पदस्थापनेच्या ठिकाणी हजर होणेकरिता या आस्थापनेवरुन **दिनांक १५/१०/२०२० म.नं.रोजी** कार्यमुक्त करण्यात येत आहे.

श्री.सुशिलकुमार नायक यांनी त्यांचेकडील शस्त्र व दारुगोळा, ओळखपत्र पोलीस मुख्यालय येथे जमा करावे व त्यांचेकडे शासकीय निवासस्थान असल्यास त्यांनी ते विहित मुदतीत रिक्त करावे. तसेच त्यांनी त्यांचे पदाचा कार्यभार प्रलंबित गुन्हे, अर्ज चौकशी इत्यादी प्रकरणांसह श्री.संजय गंगाराम पुजलवार, उपविभागीय पोलीस अधिकारी, वणी उपविभाग यांचेकडे हस्तांतरित करुन बदलीचे ठिकाणी रवाना व्हावे.

१५/१०/२०२०

( डॉ.दिलीप पाटील-भुजबळ)
पोलीस अधीक्षक, यवतमाळ.

प्रति,

**प्रत माहितीस्तव सविनय सादर :- अपर मुख्य सचिव, गृह विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.**
**पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य,मुंबई. (लक्षेवध-का.क्र.२)**
**पोलीस उप महानिरीक्षक,अमरावती परिक्षेत्र,अमरावती.**

**प्रत-पोलीस अधीक्षक, चंद्रपूर यांना माहितीकरिता सस्नेह अग्रेषित.**

**प्रतिलीपीः**-अ.पो.अधीक्षक/पोउपअधी(मुख्या)/उपविभागीय पोलीस अधिकारी, वणी/पो.नियंत्रण कक्ष/राखीव पोलीस निरीक्षक पो.मु/लघुलेखक/कक्ष-३-इमारत लिपिक/कक्ष-४-पोलीस कल्याण शाखा/कक्ष-१२-विभागीय चौकशी/कक्ष-१४-राजपत्र लिपिक/ कक्ष- १७-वेतन लिपीक-२

क्रमांक :पोअय/कक्ष - ९(५)/ प्रसुती रजा/ 8463 /२०२०
कार्यालय पोलीस अधीक्षक, यवतमाळ.
एल. आय. सी. चौक, ता. व जि. यवतमाळ.
पिन कोड: ४४५ ००१.
Email- sp.yavatmal@mahapolice.gov.in
दिनांक : 15 OCT 2020

विषय :- प्रसुती रजा मंजुरीबाबत.

----००------

## आदेश

मपोशि/२७१५, सरस्वती मुळे नेमणुक, पो.स्टे दिग्रस यांना त्यांचे पहिली प्रसुती करिता महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) १९८१ मधील नियम ७४ चे तरतुदीनुसार व महाराष्ट्र शासन निर्णय वित्त विभाग क्र.अ.रजा-१४०९/प्र.क्र.८/०९सेवा-६, दिनांक २४/०८/२०१४ अन्वये रजेवर सुटल्याचे तारखेपासुन १८० दिवस प्रसुती रजा (विशेष रजा) तसेच पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे पत्र क्रमांक पोमसं/२८अे/४९३७/महिला पोलीस - विशेष पोषणअनुदान/३३(०२)/ २०१८ दिनांक २३/०२/२०१८ अन्वये विशेष पोषण आहार अनुदान रु ५०००/- पोलीस कल्याण निधीतून मंजुर करण्यात येत आहे.

मा.पोलीस अधीक्षक,
यांचे मान्यतेनुसार

(डॉ. के. ए. धरणे)
अपर पोलीस अधीक्षक,
पोलिस अधीक्षक यवतमाळ करिता

प्रति,

ठाणेदार,पो.स्टे दिग्रस

प्रत :- मपोशि/२७१५, सरस्वती मुळे नेमणुक, पो.स्टे दिग्रस

२/ तसेच जन्मास आलेले अपत्य हे मुलगी असल्यास जन्म प्रमाणपत्र जोडुन वर नमुद अनुदाना व्यतिरीक्त रु.५०००/- इतके सदृढ बालिका अनुदान मिळणे करिता या कार्यालयास अर्ज सादर करावा.

प्रत :- पोलीस कल्याण निधी लिपीक/डिपीजी लिपीक यांना माहिती व आवश्यक कार्यवाहिस्तव.

क्रमांक :पोअय/कक्ष - ९(५)/ प्रसुती रजा/ 8462 /२०२०
कार्यालय पोलीस अधीक्षक, यवतमाळ.
एल. आय. सी. चौक, ता. व जि. यवतमाळ.
पिन कोडः ४४५ ००१.
Email- sp.yavatmal@mahapolice.gov.in
दिनांक : 15 OCT 2020

विषय :- प्रसुती रजा मंजुरीबाबत.

----oo------

## आदेश

मपोना/२१०२, मनिषा वाघमारे नेमणुक, पो.स्टे यवतमाळ शहर यांना त्यांचे पहिली प्रसुती करिता महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) १९८१ मधील नियम ७४ चे तरतुदीनुसार व महाराष्ट्र शासन निर्णय वित्त विभाग क्र.अ.रजा-१४०९/प्र.क्र.८/०९सेवा-६, दिनांक २४/०८/२०१४ अन्वये रजेवर सुटल्याचे तारखेपासुन १८० दिवस प्रसुती रजा (विशेष रजा) तसेच पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे पत्र क्रमांक पोमसं/२८ओ/४९३७/महिला पोलीस - विशेष पोषणअनुदान/३३(०२)/ २०१८ दिनांक २३/०२/२०१८ अन्वये विशेष पोषण आहार अनुदान रु. ५०००/- पोलीस कल्याण निधीतून मंजुर करण्यात येत आहे.

मा.पोलीस अधीक्षक,
यांचे मान्यतेनुसार

(डॉ. के. ए. धरणे)
अपर पोलीस अधीक्षक,
पोलिस अधीक्षक यवतमाळ करिता

प्रति,

ठाणेदार,पो.स्टे दिग्रस

प्रत :- मपोना/२१०२, मनिषा वाघमारे नेमणुक, पो.स्टे यवतमाळ शहर

२/ तसेच जन्मास आलेले अपत्य हे मुलगी असल्यास जन्म प्रमाणपत्र जोडुन वर नमुद अनुदाना व्यतिरीक्त रु.५०००/- इतके सदृढ बालिका अनुदान मिळणे करिता या कार्यालयास अर्ज सादर करावा.

प्रत :- पोलीस कल्याण निधी लिपीक/डिपीजी लिपीक यांना माहिती व आवश्यक कार्यवाहिस्तव.

8485

क्र:पोअय/कक्ष-१०/डिडिओ अतिरिक्त कार्यभार/ /२०२०
कार्यालय पोलीस अधीक्षक, यवतमाळ.
एल. आय. सी. चौक, ता. व जि. यवतमाळ.
पिन कोड: ४४५ ००१.
Email- sp.yavatmal@mahapolice.gov.in
दिनांक :
15 OCT 2020

## आदेश

संदर्भ :-आदेश क्र:पोअय/कक्ष-१०/डिडिओ अतिरिक्त कार्यभार/८३३४/२०२०, दि.०९/१०/२०२०

विषय :-आहरण व संवितरण अधिकारी पदाचे कार्यभाराबाबत.

****

उपरोक्त विषय व संदर्भांकित आदेशान्वये आहरण व संवितरण अधिकारी, यवतमाळ (D.D.O.) या पदाचा अतिरिक्त कार्यभार पुढील आदेशापर्यंत डॉ.श्री.के.अे.धरणे, अपर पोलीस अधीक्षक, यवतमाळ यांचेकडे सोपविण्यात आला होता.

संदर्भिय आदेशात प्रशासकीय कारणास्तव बदल करण्यात येत असून आता, डॉ.श्री.के.अे.धरणे, अपर पोलीस अधीक्षक, यवतमाळ यांचे ऐवजी आहरण व संवितरण अधिकारी, यवतमाळ (D.D.O.) या पदाचा अतिरिक्त कार्यभार पुढील आदेशापर्यंत श्रीमती माधुरी दिलीप बाविस्कर, प्रभारी पोलीस उप अधीक्षक (मुख्यालय), यवतमाळ यांचेकडे सोपविण्यात येत आहे.

सर्व संबंधितांनी याची नोंद घेऊन उचित कार्यवाही करावी.

( डॉ.दिलीप पाटील-भुजबळ)
पोलीस अधीक्षक, यवतमाळ.

प्रति,

डॉ.श्री.के.अे.धरणे, अपर पोलीस अधीक्षक, यवतमाळ.
श्रीमती माधुरी दिलीप बाविस्कर, प्रभारी पोलीस उप अधीक्षक (मुख्यालय), यवतमाळ.

प्रतीलीपी :-अ.पो.अ./पोउपअधी(मुख्या)/सर्व प्रमुख लिपिक/कक्ष-१४-राजपत्र लिपिक /स्विय सहायक यांना माहिती व उचित कार्यवाहीकरिता.

प्रत-कोषागार अधिकारी, यवतमाळ.